नाशिक महानगरपालिका, नाशिक

नगरनियोजन विभाग

**जाहिर प्रकटन**

**विषय:- नाशिक महानगरपालिका हद्दीतील गुंठेवारी बांधकामे नियमाधीन करणेबाबत...**

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) व अधिनियम 2001 अन्वये विकसन प्रस्ताव दाखल करुन गुंठेवारी विकासांचे नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण करणे या करीता महाराष्ट्र शासनाने दिनांक १३ ऑगस्ट २००१ रोजी, सन २००१ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ अन्वये शासन आदेश काढून गुंठेवारी विकसनाकरीता मार्गदर्शक सुचना व विहीत कार्यपध्दती नमूद केलेली आहे.

त्यानुसार दिनांक १२/०३/२०२१ रोजी मा. शासना तर्फे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) व अधिनियम २००१ मधील कलम ३(१) मध्ये दिनांक १२/०३/२०२१ रोजी सुधारणा करण्यात आली असून, त्यानुसार नाशिक महानगरपालिका हद्दीतील दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत गुंठेवारी अंतर्गत झालेले विकास नियमित करता येतील, त्याअनुषंगाने सदरचे जाहिर निवेदन प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून पुढील सहा महिन्यांचे कालावधीत गुंठेवारी अंतर्गत प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेमार्फत स्वीकारणेत येतील व त्याची नियमानुसार छाननी करुन मंजुरीबाबत आवश्यक कार्यवाही करणेत येईल. सदरचे परीपुर्ण प्रस्ताव हे वास्तुविशारद/इंजिनियर/सुपरवायझर या तांत्रिक संवर्गातील प्रतिनिधींमार्फत सादर करणे बंधनकारक असेल, विहीत केलेल्या सहा महिने मुदतीनंतर विकसन प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

स्वाक्षरी X X X
(दिपक वराडे )
उप संचालक नगररचना
नाशिक महानगरपालिका, नाशिक

स्वाक्षरी X X X
(मनिषा खत्री भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक